‘मराठा विद्या प्रसारक समाजाचे’

कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओझर.मिग,

ता.निफाड, जि.नाशिक

प्रा.शंकर आवारे

# फ्रेंच राज्यक्रांतीची सामाजिक कारणे

# फ्रेंच राज्यक्रांती १४ जुलै १७८९

फ्रेंच राज्यक्रांतीने जगास स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही महान लोकशाहीची तत्वे बहाल केली. त्यामुळे जगाच्या इतिहासात या क्रांतीस महत्वाचे स्थान आहे. जुन्या, जुल्मी व अन्यायी राजवटीचा शेवट घडवून आणला व देशात प्रथमता लोकशाहीची स्थापना केली. जवळ जवळ २५० वर्षापासूनची असणारी ब्युरबॉन अन्यायी राजघराण्याची सत्ता १७८९ मध्ये संपुष्टात आणली. अशा या महत्वाच्या व महान राज्यक्रांतीच्या कारणांचा अभ्यास आपणास खालील प्रमाणे करता येईल.

# ❑ सामाजिक कारणे—सामाजिक विषमता






## ❑ उमराव :—

- उमराव, संरजामदार, राजाचे नातेवाईक, मंत्री व उच्च सरकारी अधिकारी.
- देशातील ५० ते ६० % जमीन व संपत्ती यांच्या मालकीची होती.
- हजारो दास त्यांच्या शेतावर राबून व त्यांना कर देत असत.
- सरकारकडून विशेष अधिकार बहाल.
- सरकारला कोणताच कर देत नसत.
- चैन व विलासी जिवन.

## ❑ धर्मगुरू:–

- रोमन कॅथालिक पंथाचा प्रभाव.
- आर्च बिशप, बिशप, कनिष्ठ व वरिष्ठ धर्मगुरु.
- सर्व संपत्ती चर्चच्या मालकीची व चर्चवर अधिकार.
- देशावर धार्मिक वर्चस्व व अंधश्रध्दाळु, अज्ञान समाज.
- जनतेवर 'टाईथ' नावाचा धार्मिक कर.

## ❑ सर्व सामान्य जनता:—

- राजा, उमराव, धर्मगुरु यांना कर द्यावा लागे.
- उमरावांच्या शेतावर भुदास संख्येने जास्त.
- समाजात आर्थिक विषमता.
- अन्याय—अत्याचारग्रस्त, शोषित समाज.